वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

पुणे पोलीस

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./1052/२०२४ दिनांक :- 09/०२/२०२४

**प्रेसनोट**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकामध्ये उड्डाणपूल व मेट्रो पिलरचे काम चालु असल्याने चौकामध्ये वाहतूकीसाठी कमी रुंदीचा रस्ता उपलब्ध होत आहे. त्यामुळे गणेशखिंड रोड, औंध रोड, बाणेर रोडवर वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक व परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्याकरीता गणेशखिंड रोड व परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर चतु:श्रृंगी, खडकी वाहतूक विभागातील वाहतूकीत **दि.१०/०२/२०२४ रोजीपासून पुढील आदेशापर्यत** खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी औंध रोडवरुन औंध, सांगवी, पिंपरी चिंचवड, हिंजवडी परिसरामधील शिवाजीनगरकडे येणारी व शिवाजीनगर कडून औंध, सांगवी, पिंपरी चिंचवड, हिंजवडी कडे जाणाऱ्या वाहनचालकांनी खालीलप्रमाणे बदल केलेल्या मार्गाचा अवलंब करावा.

- शिवाजीनगरकडुन गणेशखिंड रोडने औंध, सांगवी, पिंपरी चिंचवड, हिंजवडी कडे जाणा-या वाहनचालकांनी एबिल हाऊस येथून उजवीकडे वळण घेवून सरळ रेंजहिल्स, सिंफनी चौक मार्गे साई चौक खडकी, डॉ. आंबेडकर चौक बोपोडी सरळ स्पायसर चौक मार्गे ब्रेमेन चौकातुन इच्छित स्थळी जावे.
- औंध गावाकडून शिवाजीनगर व पुणे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांनी ब्रेमेन चौकातुन डावीकडे वळण घेवून सरळ स्पायसर जंक्शन, डॉ. आंबेडकर चौक, साई चौक खडकी, रेंजहिल्स चौक मार्गे इच्छित स्थळी जावे.
- एबिल हाऊस चौकामध्ये रेंजहिल्सकडून येवून उजवीकडे वळण घेण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी राहिल.
- गणेशखिंड रोडवरील संगण्णा धोत्रे पथ जाणे-येणेस दुहेरी मार्ग सुरु राहिल.
- गणेशखिंड रोडवरवील खाऊ गल्ली मार्गे ओम सुपर मार्केट सर्कलकडे जाण्यासाठी एकेरी वाहतूक करण्यात आलेली आहे व सिम्बायोसिस कॉलेज कडून खाऊ गल्लीतुन गणेशखिंड रोडवर येण्यास बंदी राहिल.

9.2.24
( शशिकांत बोराटे )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- सर्व संबंधितांना